# “महाराष्ट्रातील ब्रेल ग्रंथालयांचा तौलनिक अभ्यास

ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विद्यानिष्णात (एम. फिल.)

पदवी करिता

सादर


अभ्यासक

## वृषाली बाळासाहेब पानसरे

मार्गदर्शक

### डॉ. मनोज कुलकर्णी

वरिष्ठ ग्रंथपाल, यशदा, पुणे



टिळक महाराष्ट्र विद्यापीठ

गुलटेकडी पुणे ४११ ०३७

सन २०१३

## मार्गदर्शकाचे प्रमाणपत्र

प्रमाणित करण्याते की, कु. वृषाली बाळासाहेब पानसरे यांनी ‘‘महाराष्ट्रातील ब्रेल ग्रंथालयांचा तौलनिक अभ्यास या विषयावरील संशोधन प्रकल्प माझ्या मार्गदर्शनाखाली आणि निरीक्षणाखाली तयार करून टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे यांस सादर केला.

मी असे प्रमाणित करतो की या संशोधन प्रकल्पाचा कोणताही भाग कोणत्याही विद्यापीठास सदर केलेला नाही.

**स्थळ पुणे**

**दिनांक**

**डॉ. मनोज कुलकर्णी**

**वरिष्ठ ग्रंथपाल, यशदा, पुणे**

## संशोधकाचे प्रतिज्ञापत्र

मी, कु वृषाली बाळासाहेब पानसरे असे प्रमाणित करते की ‘‘महाराष्ट्रातील ब्रेल ग्रंथालयांचा तौलनिक अभ्यास हा संशोधन प्रकल्प मी पूर्ण केला असून त्यातील सर्व माहिती मूळ संदर्भातून घेतली आहे. त्या माहितीचा संदर्भ योग्य त्या ठिकाणी नमूद केले आहेत.

हा संशोधन प्रकल्प माझा स्वतःचा असून या विषयावर यापूर्वी संशोधन झालेले नाही याची मी खात्री केली आहे. तसेच मी हा संशोधन प्रकल्प इतर कोठेही सादर केलेला नाही.

**स्थळ पुणे**

**दिनांक** **कु. वृषाली बाळासाहेब पानसरे**

# ऋणनिर्देश

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे यांच्या ग्रंथालय व माहितीशास्त्र या अभ्यासक्रमाच्या एम. फिल. पद्विकरिता हा संशोधन प्रकल्प सादर करताना मला अनेकांचे सहकार्य लाभले. प्रथम विद्यापीठाची मी अत्यंत आभारी आहे. ग्रंथपाल श्रीमती डॉ. घनिष्ठा खंदारे, श्री अवधूत कुलकर्णी आणि इतर कर्मचारीवर्ग यांचे मला वेळोवेळी मार्गदर्शन व सहकार्य यामुळे मी हा प्रकल्प पूर्ण करू शकले.

हा प्रकल्प पूर्ण करताना मार्गदर्शक डॉ. मनोज कुलकर्णी, श्री. आनंद बडवे आणि सौ. मीरा बडवे तसेच माझ्या 'निवांत' टीम चे सर्व सदस्य यांनी आपुलकीने मार्गदर्शन केले व प्रोत्साहन दिले. हा प्रकल्प त्यांच्या मुळेच पूर्ण झाला. ही सर्व माझी माणसे आहेत त्यांचे आभार न मानता त्यांच्या ऋणात राहणेच मला आवडेल.

**स्थळ : पुणे**

**दिनांक :** **कु. वृषाली बाळासाहेब पानसरे**

अनुक्रमणिका


| क्र. | शीर्षक | | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| प्रकरण १ | | | |
| | प्रस्तावना | | |
| | | प्रस्तावना | १ |
| | | विशेष ग्रंथालयांची गरज | २ |
| | | दृष्टीहिनांकरिता ग्रंथालये | ६ |
| | | सामाजिक स्थिती | १० |
| | | संशोधनाची आवश्यकता | ११ |
| | | संशोधनाची उद्दिष्टे | १२ |
| | | संशोधनाची व्याप्ती | १३ |
| | | संशोधनाची मर्यादा | १३ |
| | | संशोधनाची रुपरेषा | १४ |
| | | संदर्भ | १५ |
| प्रकरण २ | | | |
| | पूर्वाभ्यास | | १६-२० |
| | | संदर्भ | २१-२३ |
| प्रकरण ३ | | | |
| | संशोधन पद्धती | | |
| | | प्रस्तावना | २४ |
| | | संशोधन म्हणजे काय ? | २३ |

| | | | |
|---|---|---|---|
| | | वर्णनात्मक संशोधन पद्धती | २५ |
| | | प्रश्नावली पद्धती | २८ |
| प्रकरण ४ | | | |
| | ब्रेल ग्रंथालये | | |
| | | ब्रेल लिपीचा इतिहास | ३० |
| | | भारतातील ब्रेल लायब्र्रीची स्थिती | ३६ |
| | | दृष्टिबाधितासाठी समावेशक ग्रंथालये कशी निर्माण करता येतील ? | ४१ |
| | | ग्रंथालय सेवे अंतर्गत कार्यक्रम | ४१ |
| | | स्वामित्व हक्क ([illegible]) | ४५ |
| | | ब्रेल ग्रंथालये | ४६ |
| प्रकरण ५ | | | |
| | माहितीचे विश्लेषण | | |
| | | प्रस्तावना | ५१ |
| | | सर्वसाधारण माहिती | ५१ |
| | | ग्रंथालयीन सेवा व सुविधा | ५५ |
| प्रकरण ६ | | | |
| | | | |
| | | निष्कर्ष | ६५ |
| | | शिफारसी | ६७ |
| | | पुढील अभ्यासाकरिता विषय | ६९ |
| | संदर्भसूची | | ७० -७३ |
| जोडपत्र - १ | | प्रश्नावली | |
| जोडपत्र - २ | | Inclusive Libraries | |

# प्रकरण १ - प्रस्तावना

## प्रस्तावना

मानवाच्या जीवनात पंच ज्ञानेन्द्रियाना अनन्य साधारण महत्व आहे. सभोवतालच्या वातावरणाचे, सजीव, निर्जीव सृष्टीचे ज्ञान याद्वारे होते. या ज्ञान प्राप्तीच्या मार्गात सर्वात महत्वाचा वाटा दृष्टी या ज्ञानेंद्रीयाद्वारे होते. या ज्ञान प्राप्तीच्या मार्गात सर्वात महत्वाचा वाटा दृष्टी किवा नेत्रांचा असतो. सामान्यतः ७० टक्के दृष्टीच्या माध्यमातून ज्ञान प्राप्तीकडे होतो तथापि परमेश्वरांनी ज्यांची नजर मिटवली त्यांच्या मनात अंधार दाटलेला असतो असं आपल्याला नेहमीच वाटत असतं प्रकाश अन अंधार ह्या संकल्पना दृष्टिहीन मंडळींना मात्र ठाऊक नसतात. हा फरक कळायला त्यांनी प्रकाश पाहिलेलाच नसतो. अंतर्मनातल्या प्रकाशकिरणांखाली ही मंडळी सामान्य जीवन धुंडाळत राहतात. अक्षरंही गिरवतात. कधी - कधी सुंदर साहित्य निर्माण करतात. हा झाला अंतर्गत प्रवास. बाह्य जगाशी ह्यांची वैचारिक नाळ जोडली जाते ती मात्र प्रकाशातल्या अक्षरांमुळेच म्हणजे ब्रेल लिपीमुळेच. ही ब्रेल लिपी ज्यांना दृष्टी नाही त्यांचे बाह्य जगाशी संपर्क साधण्याचे साधन आहे. त्यांच्या मनातील विचार प्रकट करण्याचे, विचारांचे आदान-प्रदान करण्याचे महत्वाचे माध्यम आहे. अनेक साहित्यिकांचे साहित्य, विचारवंतांचे विचार, कवींच्या मनातील भावना समजावून घेण्याचे, त्यांच्या अंतर्मनात डोकावण्याचे साधन आहे. केवळ दृष्टी नाही म्हणून साहित्याचा आस्वाद घेता येवू नये असे नाही. म्हणूनच ब्रेललिपी ही दृष्टीहीनांकरिता वरदान आहे. ब्रेल लिपी द्वारा जगातील साहित्य, विचार दृष्टीहीनांना आज समजावून घेता येत आहेत व त्यांचे वैचारिक साहित्यीक जीवन समृद्ध होत आहे.

विविध प्रकारच्या शारीरीक क्षमता कमी असणाèया अनेक व्यक्ती या समाजात आढळतात तथापी सध्या समाजात सर्वांनाच सन्मानाने जगण्याचा व स्वत:चा विकास करुन आपले जीवनाचे ध्येय साध्य करण्याचा हक्क आहे. समाजातील सर्वांनाच आनंदाने जगता यावे या करिता विविध प्रकारची ग्रंथालये व ग्रंथसुविधा विविध देशात व विविध समाजात वेगवेगळ्या पद्धतीने विकसीत झालेल्या आढळतात. विकसित देशात या सुविधा अधिक प्रमाणात आहेत तर विकसनशील देशात अशा सुविधा व याबाबतची जागृती अभावानेच

आढळते. डॉ. रंगनाथन यांनी ‘ या पुस्तकात दुसरा नियम ‘प्रत्येक वाचकास त्याचा ग्रंथ मिळालाच पाहिजे‘ असे म्हटले आहे. त्यानुसार प्रत्येक प्रकारच्या वाचकाला त्याचा ग्रंथ मिळाला पाहिजे. म्हणूनच विविध प्रकारच्या विशेष वाचकांकरिता विशेष ग्रंथालयांची निर्मिती अपेक्षित आहे. यात तुरुंग ग्रंथालय, रुग्णालय ग्रंथालय वगैरे प्रकारच्या विशेष ग्रंथालयांचा समावेश होतो. विशिष्ठ शारिरीक क्षमता करिता अजूनच विशेष ग्रंथालयांची गरज आहे.

जागतिक बँकेने केलेल्या पाहणी अनुसार भारतातील दृष्टी दोष असलेल्या व्यक्तीची संख्या खालील प्रमाणे आहे.

| क्र | संदर्भ | संख्या |
|---|---|---|
| १ | जगात (अपंग) | ५०० |
| २ | विकसनशील देशात (अपंग) | ४०० |
| ३ | दृष्टी दोष असलेल्या व्यक्ती (जगात) | ४२ |
| ४ | दृष्टी दोष असलेल्या व्यक्ती (भारतात) | ९ |

(आकडे लाखात)


## विशेष ग्रंथालयांची गरज

सर्व तèहेच्या ‘विशेष क्षमताङ्क असणाèया अपंग व्यक्तींना वेगळ्या, त्यांच्या गरजेनुसार आवश्यक असणाèया पुस्तक निर्मितीची गरज असते. ‘ब्रेल लायब्ररीङ्क चा तौलनिक अभ्यास करताना खालील समस्याग्रस्त व्यक्तींच्या लायब्ररी वापर वा उपलब्धतेतील विशेष गरजा लक्षात आल्या. मूक बधीर -- या क्षेत्रात गेली २५ वर्षे सखोल कार्य केलेल्या सौ. विनया देसाई यांच्या मते - मूक बधिर व्यक्तींनाही वास्तविक पाहता वेगळ्या लायब्ररीची गरज आहे, परंतु अशी एकही लायब्ररी नाही जिच्यामार्फत मूक-बधीर व्यक्तींना सहजगत्या समजतील अशी पुस्तक उपलब्ध होतात. यांच्यासाठी चित्रमय पुस्तकांच्या लायब्ररीची नितांत आवश्यकता आहे. अडीच वर्षाचं एखादं लहान मूल असेल व त्याला कुत्रा हा

शब्द (विविध भाषांमध्ये जसे की कुत्ता, ऊस वगैरे) १०० वेळा दाखवणं गरजेचं आहे. छोट्यांसाठी वर वर्णन केलेली चित्रमय पुस्तकं हवीत तर मोठ्यांनाही वाचनापासून वंचित राहू नये म्हणून वेगळी पुस्तकं उपलब्ध व्हायला हवीत. मोठ्यांसाठीच्या लायब्रीचं नाव आपण ठेऊ याचा मराठी अर्थ होतो 'सारांशङ्क लायब्ररी. एखादा खूप मोठा धडा असेल तर त्याचं महत्वाचे मुद्दे घेऊन संक्षिप्त रुपांतर करणं आवश्यक आहे. सर्वसमावेशक शिक्षण पद्धतीत मूक-बधीर विद्याथ्र्याला सर्वसामान्य मुलांसाठी छापलेली पुस्तकच वापरावी लागतात. यात विषयानुरुप जे चित्रीकरण असतं ते मूक बधिर विद्याथ्र्याच्या मानाने अत्यंत अपूर असतं.

दहावीचा पेपर लिहिताना या विद्याथ्र्यांना फक्त अर्धा तासच अधिक दिला जातो. मोठ्या धड्यातला कुठलाही शब्द वस्तुनिष्ठ प्रश्नात विचारला जातो. या विद्याथ्र्यांच्या विशेष गरजा लक्षात घेऊन आपली शिक्षणपद्धती कोणताच बदल करत नाही. मोठेपणीही त्यांना भाषासमृद्ध व शब्दसंपत्ती वाढवायची असेल तर सचित्र, संक्षिप्त, स्वतंत्र लायब्ररीज् प्रत्येक शहरात उभ्या राहिल्याच पाहिजेत.

| **क्र.** | **अपंगत्वाचा प्रकार** | **एकूण %** |
|---|---|---|
| १ | शारीरिक अपंगत्व | ४१.३२ |
| २ | दृस्तीदोष | १०.३२ |
| ३ | कर्ण बधीर | ८.३६ |
| ४ | वाचा | ५.०६ |
| ५ | | 23.04 |
| 6 | एकापेक्षा जास्त | ११.५४ |




**Source: SARVEKSHANA, 36th & 47th rounds, National Sample Survey Organization, Department Of Statistics, Ministry of Planning & Program Implementation, Government of India.**

शारीरिक अक्षमता असणाèया व्यक्तींनांही वाचनाची आणि त्यासाठी लायब्ररी असण्याची खूप गरज असते. या व्यक्तींना वेगळी पुस्तकं लागत नाहीत, परंतु त्यांचा प्रश्न लायब्ररी असणं असा असतो. ‘हेल्पर्स ऑफ द हॅन्डिकॅपङ्क ही संस्था कोल्हापूरमध्ये ‘शारीरिक अक्षमताङ्क असणाèया सर्व व्यक्ती व विशेषत: विद्यार्थी यांच्या शिक्षण व पुनर्वसनासाठी काम करते. गेली २५ हून अधिक वर्षे इथे काम करणाèया या संस्थेत निरपेक्ष सेवा देणाèया पी. डी. देशपांडे यांनी आपले मत व्यक्त केले. त्यांच्या मते लायब्ररी कित्येकदा खालच्या मजल्यावर असली तरी पायèया ओलांडून लायब्ररीत जाणं व्हील चेअर वरील वा शारीरिक अपंगत्व असलेल्या व्यक्तीस शक्य होत नाही. लिफ्ट असली आणि लायब्ररी वरच्या मजल्यावर असली तरी लिफ्टपर्यंत जाण्यासाठी पायèया असतात. सारे अडथळे दूर करून व्यक्ती लायब्ररीत पोचली तरी लायब्ररीतील दुर्मिळ पुस्तकांचा उपयोग करुन लायब्ररीचा स्वतंत्र वाचन कक्ष वापरायचा असल्यास शारीरिक अपंगत्व असणारी व्यक्ती तिथे थांबू शकत नाही. तिची मूळ अडचण तिच्यासाठी स्वतंत्र व या व्यक्तीच्या गरजा पूर्ण करणारं स्वच्छतागृहच नसतं. हात नसतील, ते जरुरीपेक्षा लांबीला लहान असतील, व्यक्ती चाकाच्या खुर्चीला खिळलेली असेल तर स्वत: पुस्तक निवडीचं स्वातंत्र्य

तिला मिळताना अनंत अडचणी येतात. पुस्तकं अतिरिक्त उंचीवर असतात व अनेक ग्रंथालयांमध्ये अजूनही ग्रंथसूचीचं संगणकीकरण झालेलचं नसतं. त्यामुळे या व्यक्तींना संगणकीय यादीचाही वापर करुन आपल्या आवडीचं पुस्तक निवडणं शक्य नसतं. सरकारी स्कीम्स्मध्ये या विशेष गरजांचा विचारही झालेला नाही. हेल्पर्स ऑफ द हॅन्डिकॅप्ड यांनी चालविलेलं ‘समर्थ विद्या मंदिरङ्क व कोल्हापूरमधील ‘महावीर महाविद्यालयङ्क येथे शारीरिक अपंगत्व असणाèया व्यक्तींच्या गरजा पूर्ण करणारे वाचनकक्ष आहेत… बाकीच्यांचं काय **?** त्यांच्यासाठी कशा उभ्या राहणार लायब्ररीज् **?**

- गतिमंदत्व अथवा मतिमंदत्व असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वा व्यक्तींसाठी वेगळ्या पुस्तकांची निर्मिती करण्याची गरज आहे. यांच्यासाठी सर्वसामान्यांसाठी असणारा अभ्यासक्रम (++क्लिष्ट अभ्यासक्रम) अत्यंत छोट्या विभागात विभागला गेला पाहिजे. शैला स्वादी या ‘फिनिक्स नावाच्या स्लो लर्नर्सच्या शाळेत अनेक वर्षे कार्यरत आहेत. त्यांच्या मते गतिमंद व्यक्तींसाठी विशेष गरजा असणारी लायब्ररी आवश्यक आहे. प्रत्येक पुस्तकाचे छोटे विभाग करुन त्यावर दहा ते पंधरा समजायला अत्यंत सोपे प्रश्न असतील तर व त्यावर कृतीवर आधारित प्रकल्प सांगितलेला असेल तर स्वाभाविकच त्यांनाही लायब्ररी वापरता येईल व शिक्षणाचा आनंद उपभोगता येईल. त्यांच्यासाठीच्या लायब्ररीत आकर्षक चित्र असणारी, साधी, सोपी, सरळ भाषा असणारी, आकर्षक छपाई असणारी पुस्तक असणारी लायब्ररी हवी.

**ऑॅटिझम** - या मुलांसाठी गेली २५ वर्षाहूनही अधिक काळ काम करणा ‘प्रसन्न ऑटिझम सेंटर वरील कार्यकत्र्या सौ. साधना गोडबोलेंच्या मते ‘ऑटिस्टिकङ्क मुलांसाठी स्वत:च्या वापरासाठी लायब्ररीची गरज नाही. अत्यंत परिश्रमपूर्वक, चित्रलिपीचा वापर करुन या मुलांना प्रशिक्षण द्यावं लागतं. याचा अर्थ असा नव्हे की त्यांच्यासाठी लायब्ररी नसावी. वास्तविक पाहता त्यांच्यासाठी काम करणाèया शिक्षकांसाठी व त्यांच्या पालकांसाठी लायब्ररीची गरज नक्कीच आहे. ऑटिझम सेंटर्सची मुळातच गरज आहे व या सेंटर्सना जोडून जागृती वाढवणारी, माहितीपर, मार्गदर्शक पुस्तकांची गरज आहे.

## दृष्टीहिनांकरिता ग्रंथालये

दृष्टीहिन व्यक्तीची व्याख्या ज्या कामाकरिता पर्याप्त दृष्टीची गरज आहे अशी कामे न करता येणे असे म्हणले जाते. या मध्ये ज्यांना प्रकाशाची संकल्पना नसते आणि ज्यांना हाताची बोटे दिवसा प्रकाशात अचूकपणे मोजता येत नाहीत त्यांना दृष्टी दोष आहे असे समजले पाहिजे.


The NSSO defines visually disabled as-

"By visually disabled it was meant, loss or lack of ability to execute tasks requiring adequate visual acuity. Visually disabled include (a) those who did not have any light perception - both eyes taken together and (b) those who had light perception but could not correctly count the figures of hand (with spectacles/ contact lances it he/she used spectacles/ contact lances) from a distance of 3 meters in good day light with both eyes open. Night blindness was not considered as visual disability."

**भारतात दृष्टी दोष असलेल्या व्यक्ती (अंदाज)२००१**


| लिंग | शहरी (%) | ग्रामीण (%) | एकूण (%) |
|---|---|---|---|
| स्त्री | १५३९ (३८.४२) | ३०८(७.६९) | १८४७ (४६.११) |
| पुरुष | १७९६ (४४.८४) | ३६२ (९.०३) | २१८५ (५३.८८) |
| एकूण | ३३३५ (८३.२७) | ६७० (१६.७२) | ४००५ (१००.००) |

स्त्रोत : **Survey of Disabled Persons, NSSO,** २००१ (आकडे हजारात)




**भारतात वयानुसार दृष्टी दोष असलेल्या व्यक्ती**


च्या पाहणी अनुसार भारतात वयानुसार दृष्टी दोष असलेल्या व्यक्तीचे १,००,००० व्यक्ती मधील प्रमाण बघता असे आढळते की जसजसे वय वाढते तसतसे हे प्रमाण वाढते. ग्रामीण व शहरी भागात प्रमाण खूप बदलते आहे. एकूण दर एक लाख व्यक्ती मध्ये ग्रामीण भागात पूर्ण अंध व्यक्ती २१० आहेत तर कमी दृष्टीच्या व्यक्ती ८६ आहेत. शहरी भागात हेच प्रमाण १४० व ५४ असे कमी आढळते.



भारतात वयानुसार दृष्टी दोष असलेल्या व्यक्तीचे १,००,००० व्यक्ती मधील प्रमाण

| वयोगट | ग्रामीण | | शहरी | |
|---|---|---|---|---|
| | अंध | कमी दृष्टी | अंध | कमी दृष्टी |
| ०-४ | ३२ | ५ | ३० | ५ |
| ५-९ | ४८ | १२ | ७३ | १६ |
| १०-१४ | ५२ | २२ | ८२ | १० |
| १५-१९ | ५६ | २१ | ४४ | १३ |
| २०-२४ | ६५ | २३ | ५६ | १८ |
| २५-२९ | ६८ | १७ | ४३ | २० |
| ३०-३४ | ७७ | १६ | ३० | १९ |
| ३५-३९ | ७५ | ३२ | ५३ | २० |
| ४०-४४ | १२८ | ४३ | ७९ | ३० |
| ४५-४९ | १८३ | ६५ | १०५ | ३९ |
| ५०-५४ | २६६ | १२४ | १८२ | ९८ |
| ५५-५९ | ४३१ | २३४ | २८३ | १२२ |
| ६० पेक्षा जास्त | १७३३ | ७४७ | १०८७ | ४५९ |
| एकूण | २१० | ८६ | १४० | ५४ |

# भारतातील दृष्टिहीन व्यक्तीचे राज्यातील वितरण




| | | |
|---|---|---|
| **Highest** | : | Orissa, Assam |
| **High** | : | Andhra Pradesh, Himachal Pradesh, Tamil Nadu, Haryana, Punjab, Karnataka, Uttar Pradesh |
| **Moderate** | : | Maharashtra, Madhya Pradesh, Rajasthan, Kerala, West Bengal, Gujarat Bihar |
| **Low** | : | Chandigarh, DN Haveli, Delhi, Manipur, Meghalaya, Mizoram, Nagaland, |

75




विशेष ग्रंथांची गरज असणारे दृष्टीहीन व्यक्तींपैकी भारतात वयानुसार ५ ते २४ हे शिकण्याचे वय असून नंतरचा गट निरंतर शिक्षणाकरिता वाचन करणारा आहे. असे असले तरी समाजाची अंध व्यक्तीकडे पाहण्याची दृष्टी फारशी सकारात्मक नाही. या शिवाय त्यांच्या या गरजाकडे फारसे गंभीरपणे पाहिलेजात नाही.

## सामाजिक स्थिती

एखादी व्यक्ती जेव्हा आपल्या डोळ्यांनी बघू शकत नाही तेव्हा ती व्यक्ती हळूहळू समाजापासून दूर जाते व मुख्य प्रवाहात राहू शकत नाही. दृष्टीदोष निर्माण होण्याकरिता काही कारणे नमूद केली आहेत ती पुढील प्रमाणे:

१. जन्मापासून अंध

२. वयाच्या काही वर्षानंतर दृष्टी जाते.

३. दृष्टी दोषांमुळे

४.        अपघातामुळे

अशा प्रकारच्या कारणांमुळे जर व्यक्ती दृष्टिहीन झाली तरी त्यांचे प्रश्नांचे स्वरुप वेगवेगळे आढळते. जन्मापासून अंध किंवा वयाच्या ० ते ८ वर्षात जर व्यक्ती दृष्टीहीन झाली तर ती व्यक्ती पुढे जीवनात शिक्षणाकरिता ब्रेल पुस्तकांवर अवलंबून राहते qकवा तिची ती आवश्यकता असते. गरज असते ती आवश्यक त्या सुविधा व प्रेरणा देण्याची. मात्र एखादी शिक्षित व्यक्ती पुढे चालून दृष्टिहीन झाली तर ती व्यक्ती ब्रेल शिवाय देखील आपली उपजिविका करु शकेल. मात्र जन्मतः ज्यांना दृष्टी नाही त्यांना ब्रेल ग्रंथाद्वारा जगाचे ज्ञान समजून घेता येणे शक्य आहे म्हणूनच अंधांसाठीच्या ग्रंथालयांचे समाजात अनन्य साधरण महत्व आहे.

## संशोधनाची आवश्यकता

समाजातील विभिन्न घटकांच्या प्रगतीकडे शासनाचे समाजातील विचारवंतांचे, प्रशासकांचे, समाजसुधारकांचे सतत लक्ष असते. आदिवासी, मागासवर्गीय, आर्थिक दुर्बल, सामाजिक दृष्टया मागासलेले, दुर्बल  या बरोबरच  समाजाचा भाग असलेल्या  अंध  व्यक्तीसाठी आजच्या  समाजात किती आत्मियता आहे ? त्यांना बरोबरीने विकासाच्या संधी उपलब्ध आहेत का ? ज्यांचा अत्यंत महत्वाचा ज्ञान प्राप्तीचा मार्ग  ‘दृष्टी’ किवा ‘नेत्र’  नाही त्यांना ज्ञानप्राप्तीचा व त्याद्वारे  स्वतःचा विकास करुन घेऊन सामाजिक विकासात आपला हातभार लावण्याकरिता समाजात ‘खास सोई केल्या आहेत का?

समाजाची सामाजिक उन्नती ही समाजातील जास्तीतजास्त घटकांची प्रगती होण्यावर अवलंबून असते. अंध किवा दृष्टी कमी असलेली व्यक्तीही देखील समाजाचा एक भाग आहे. त्यांना प्रगतीच्या कोणत्या वाटा उपलब्ध आहेत?

‘ब्रेल ग्रंथालये ही या दृष्टीने अत्यंत महत्वाची भूमिका बजावत आहेत. ब्रेल ग्रंथालये दृष्टीहीनांकरिता ज्ञान प्राप्तीचा राजमार्ग आहेत. आत्मविकास व आत्मसन्मानाने या  जगात जगण्याचा ज्ञानदीप आहेत. म्हणूनच समाजातील दृष्टीहीनांसाठीच्या ग्रंथालयांची काय स्थिती आहे, हे समजून घेणे अगत्याचे आहे.

संशोधक स्वतः दृष्टिहीन आहे. आणि एका ब्रेल ग्रंथालयाचा ग्रंथपाल असल्याने याबाबत इतरत्र काय स्थिती आहे हे समजून घेण्याची व त्याचा अभ्यास करण्याची इच्छा मनात आहे. या अभ्यासाद्वारे ब्रेल ग्रंथांची आवश्यकता, समाजात या विषयाची जागृकता व शासनाला याबाबतची निकड ठाशीवपणे सांगणे संशोधनकर्त्याला आवश्यक वाटत आहे. आणि म्हणूनच **"महाराष्ट्रातील ब्रेल ग्रंथालयांचा तौलनिक अभ्यास** हा विषय संशोधकाने हाती घेतला आहे.

## संशोधनाची उद्दिष्टे

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने खालील उद्दिष्टे निश्चित केली आहते .

१. महाराष्ट्र राज्यात खास अंधव्यक्तींसाठी उपलब्ध असलेली ग्रंथालये कोणती आहेत यांची यादी बनवणे.

२. राज्यातील ब्रेल ग्रंथालयांचा सखोल अभ्यास करुन त्यांचे संग्रह, सभासद, ग्रंथालय सेवा, मासिके इ. बाबत माहिती घेणे.

३. राज्यातील ब्रेल ग्रंथांचा वापर कसा होत आहे याबाबत अभ्यास करणे.

४. ब्रेल ग्रंथालयांच्या वाचकांसाठीच्या उपलब्ध सुविधांबाबत अभ्यास करणे.

५. ब्रेल ग्रंथालयां बाबत शासन धोरणांचा अभ्यास करणे.

६. ब्रेल ग्रंथालयांच्या विकासाकरिता व सूचना व शिफारशी करणे.

## संशोधनाची व्याप्ती

प्रस्तुत संशोधनाकरिता महाराष्ट्र राज्यातील ब्रेल ग्रंथांचा संग्रह असलेली सात ग्रंथालये संशोधनाकरिता निवडलेली आहेत. यामध्ये एक सार्वजनिक ग्रंथालय असून इतर सहा ग्रंथालये ही विविध सेवाभावी संस्थेद्वारा चालवली जातात.

| क्र | ग्रंथालयाचे नाव |
|---|---|
| १ | अहमदनगर जिल्हा वाचनालय, ३७५० चितळे रोड नेताजी सुभाष चौक, अहमदनगर ४१४००१ |
| २ | व्हिजन अनलिमिटेड, 'निवांत' सर्वे नं ३३/१ प्लॉट नं ७५ पुणे ४११०३२ |
| ३ | लायन्स क्लब संचलित अंध विकास संस्था, हनुमान मैदान, पंढरपूर जि. सोलापूर ४१३३०४ |
| ४ | स्नेहज्योती, निवासी अंध विद्यालय मु.पो. घराडी ता. मंडणगड जि रत्नागिरी ४१५२०३ |
| ५ | अंध शाळा (मुलांची), १४/१७ कोरेगाव पार्क पुणे ४११००१ |
| ६ | पुणे अंध मुलींची शाळा, गांधी भवन जवळ कोथरूड पुणे ४११००३८ |
| ७ | सौ सुशीलाबाई घोडावत निवासी अंध शाळा, प्लॉट क्र. 40 , मिरज |

## संशोधनाची मर्यादा

ज्या ग्रंथालयांमध्ये अगदी मोजकी / नगण्य ब्रेल पुस्तके आहेत किवा जिथे ब्रेल वाचक नाहीत अशा ग्रंथालयांचा या संशोधनात समावेश केला नाही.

## संशोधनाची रुपरेषा

वरील उद्दिष्टांच्या पूर्ततेकरिता संशोधकाने खालील प्रमाणे संशोधनाची रुपरेषा ठरवून अभ्यास केला आहे. प्रस्तुत अभ्यासाची मांडणी पुढील प्रमाणे आहे.

प्रकरण १ - प्रस्तावना, संशोधनाची गरज, संशोधनाची उद्दिष्टे, मर्यादा, व्याप्ती.

प्रकरण २ - पूर्वाभ्यास

प्रकरण ३ - संशोधन पद्धती

प्रकरण ४ - ब्रेल ग्रंथालये - उगम, विकास व निवडक ग्रंथालयांची माहिती.

प्रकरण ५ - माहितीचे विश्लेषण व चर्चा

प्रकरण ६ - निष्कर्ष, शिफारसी व पुढील संशोधनाची दिशा.

# संदर्भ


१. Directorate General of Health Services (1992): Present Status of National Programme for Control of Blindness (NPCB),New Delhi: Ophthalmology Section, P. 138

२. Ministry of Welfare (1984): Survey of Disabled Persons, New Delhi, p.32

३. Ministry of Welfare (1986) : Handbook on Social Welfare Statistics, New Delhi p.423

४. National Sample Survey Organization, Department of Statistics (1991): A Report on Disabled Persons: Forty Seventh Round, New Delhi: July-December. P. A-136

५. Punani, (Dr.) Bhushan and Rawal, Nandini (1997): Community Based Rehabilitation: Visually Impaired, Mumbai: National Association for the Blind, Rural Activities Committee, P. 267

६. SARVEKSHANA, 36th & 47th rounds, National Sample Survey Organization, Department Of Statistics, Ministry of Planning & Program Implementation, Government of India.

७. **Survey of Disabled Persons, NSSO, २००१**

# प्रकरण २ - पूर्वाभ्यास

विविध प्रकारच्या ग्रंथालयांचा अभ्यास ग्रंथालय शास्त्रातील संशोधक नेहमीच करीत आले आहेत. या मध्ये सार्वजनिक ग्रंथालये, विशेष ग्रंथालये किंवा शैक्षणिक ग्रंथालये यांचे विविध अंगाने संशोधन झालेले आढळते. वाचकांचा ग्रंथालयत सहभाग, विविध विषयांचा वापर, ग्रंथालयीन सुविधा बद्दल वाचकांचे मत, वेगवेगळ्या ग्रंथालयांचे सर्वेक्षण अशा अनेक विषयांवर संशोधन झालेले आढळते.

विशेष ग्रंथालायांपैकी मोठ्या ग्रंथालयांना अधिक महत्व संशोधनात दिलेले आढळते. विविध प्रकारची विशेष ग्रंथालये अभ्यासली गेली आहेत. मात्र जी ग्रंथालये मुळातच छोटी आहेत व ज्यांची संख्या कमी आहे त्यांचा अभ्यास कमी झालेला आढळतो. याच प्रकारात दृष्टी दोष असलेल्या व्यक्तीं करिताच्या ग्रंथालयांचा समावेश होतो. ब्रेल ग्रंथालयाचा भारतात फारसा अभ्यास झालेला दिसत नाही. परदेशात असा अभ्यास झालेला आढळतो. तरीही परदेशात व भारतात सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक फरक असल्याने ग्रंथालयांच्या परिस्थितीत खूप मोठा फरक आढळतो. अर्थात, विकसनशील देशांमध्ये ग्रंथालयात फार फरक आढळून येत नाही.

संशोधकाने नेट वरून व विविध साहित्यातून खालील प्रमाणे अभ्यास केला आहे.

**अद्तोरो, निरान (२०११)** यांच्या मते दृष्टी दोष असलेल्या व्यक्तीं करिता उपलब्ध माहितीची साधने वापराकरिता सुयोग्य प्रकारात बदलवणे महत्वाचे आहे. कारण त्याची उपलब्धता मर्यादित आहे. “Information materials for the visually impaired must be transcribed into alternative format before they are made available for use. The use of information materials in alternative format by the visually impaired is limited by availability.” नायजेरीतील १४ ग्रंथालयातील अभ्यासामध्ये असे आढळून आले की ब्रेल ग्रंथ व बोलकी पुस्तके अशी माध्यमे दृष्टी दोष असलेल्या व्यक्तीं अधिक पसंत करतात.

**वे, झांग व इतर (२०१०)** या चीन मधील संशोधकांनी केलेल्या पाहणीत असे आढळून आले की दृष्टी दोष असलेल्या व्यक्तीं करिता ग्रंथालयीन सेवेमध्ये केवळ ग्रंथालयीन सेवा महत्वाची नसून त्यामधून समाजाचा दृष्टी दोष असलेल्या व्यक्तींकडे बघण्याचा दृष्टीकोन

दिसून येतो. The service level for visually impaired juveniles is not only a criterion to measure library services level, but also an important mark to measure social civilization degree. Visually impaired juveniles need bright and warmth as well as need culture and convenience. Various culture service institutions at all levels should provide more perfect and convenient services for them, and work together to create good social environment for equal share of cultural information. माहितीचे समंद वाटप व समान सामाजिक दृष्टी या मधून दिसते.

**उर्तोय निल्त्फेर व इतर (२०११)** यांनी संगकाच्या मदतीने लिपीचे भाषेत रुपांतर करून दृष्टी दोष असलेल्या व्यक्तीं करिता ग्रंथालये निर्माण करावीत असे सुचवले आहे. प्रयोग करून Sakarya University मध्ये अशी प्रणाली विकसित केली की (A visually impaired person can use the system with the help of sound orientation of the program and the keyboard commands of the user) दृष्टी दोष असलेल्या व्यक्तीं संगणकावर माहितीचे वाचन करू शकतील.

**षण्मुगम (२०१२)** यांनी दृष्टिहीनांचे वाचन व लेखनाबाबत चर्चा करताना मुख्यत्वे करुन पाच बाबींवर भर असावा असे म्हटले आहे. यात उपबध्दता (), जाणीव, , आणि यांना अधिक महत्व दिले आहे.

**देशपांडे आणि पिल्ले (२०१२)** यांनी भारतातील ग्रंथालयांतील दृष्टिहीनांच्या करिता सर्वसाधारण ीग्रंथालयाबरोबर ज्या सुविधा आहेत त्यांचा उहापोह केला आहे. यामध्ये स्वयंसेवी संस्थांचा मोठा हातभार असल्याचे त्यांची म्हटले आहे. तसेच ब्रेल पुस्तकां बरोबरच मोठ्या टाईप मधील पुस्तके, ॲडीओ कॅसेट्स व सिडीज या देखील उपलब्ध केल्या जाव्यात असे म्हटले आहे. ‘सर्व समावेशकङ्क () ग्रंथालयांनी ग्रंथालयाचे आवार () सेवा आणि संग्रह () ह्या सर्वांनाच कशा प्रकारे उपयोगात येईल हे सुचविले आहे. त्याच प्रमाणे डिजीटल ग्रंथालयांचे दृष्टिहिनांच्या दृष्टीने महत्व अधोरेखीत केले आहे.

**जशनानी (२०१२)** यांनी खखच बेंगलोर, या संस्थेतील नाविन्यपूर्ण व सामाजिक जबाबदारीतील महत्वाचा उपक्रम नोंदविला आहे. यात सर्वच प्रकारच्या शारीरिक दृष्ट्या अकार्यक्षम व्यक्तीकरिता ‘समान संधीङ्क त्यांच्या विशेष हक्कांचे संरक्षण आणि पूर्ण सहभाग या तत्वांवर आधारित बाबींचा उल्लेख केला आहे. संस्थेतील प्रवेश

प्रक्रिया, संस्थेच्या परिसरातील सुविधा आणि भविष्यातील रोजगारांची संधी या सर्व बाबींकडे खास लक्ष पुरवून एक आदर्श संस्था म्हणून ने नावलौकीक मिळवला आहे.


**कपूर (२०१२)** यांनी माहिती तंत्रज्ञान दृष्टीहीनां करिता कशा प्रकारे उपयुक्त होत आहे याची माहिती दिली आहे. यामध्ये , , , इ बाबतीत माहिती दिली आहे.

**तारा पोरवाला (२०१२)** यांनी सर्वांना सारखा अधिकार मिळण्याच्या दृष्टीने दृष्टिहीनांकरिता जगातील ज्ञान भांडार कसे खुले करता येईल याचा विचार केला आहे. त्यांनी यामध्ये मालकी हक्क / स्वामित्व हक्कांचा, कायदेशीर बाजूचा आणि सामाजिक जबाबदारीचा विचार मांडला आहे. यात जागतीक पातळीवरील () प्रकल्पाचा उल्लेख व महत्व विषद केले आहे.

**रामकुमार (२०१२)** यांनी आपल्या लेखात सध्या देशातील अनेक संस्था, शासन विभाग यांचेकडून विविध प्रकारच्या शारिरीकदृष्ट्या अकार्यक्षम व्यक्ती करिता आणि खास करुन दृष्टीहिनांकरीता संसाधने उपलन्ध करुन देण्याकरीता करण्यात येणाèया प्रयत्नांबाबत चर्चा केली आहे. यात वेगवेगळ्या कायद्यामधील कलमे व त्यातील तरतुदींचा समावेश आहे.

**भोळे (२०१२)** यांनी दृष्टिदोषीत व्यक्तींकरिता माहिती तंत्रज्ञानाची उपयोगीता आणि त्यांच्याकरीता असणाèया विविध आज्ञावलीची माहिती व उपयोग यांचे वर्णन केले आहे. उपलब्ध तंत्रज्ञानाद्वारे व्यक्ती आपले ज्ञान सतत अद्ययावत ठेवू शकतो.

**शंकर (२०१२)** यांनी आपल्या लेखात ङ्कग्रंथालयी बोलक्या पुस्तकांचा वापर या बद्दल माहिती दिली आहे व अशी पुस्तके दृष्टीदोष असलेल्या व्यक्ती कशा प्रकारे वापरु शकतील ते दर्शविले आहे.




**बसु (२०१२)** यांनी पश्चिम बंगाल मधील ग्रंथालयाद्वारे दृष्टीदोष असलेल्या व्यक्तींकरीता ग्रंथालय सेवेचा अभ्यास केला आहे. यामध्ये राज्य मध्यवर्ती ग्रंथालयाने खास संग्रह केलेल्या व ब्रेल पुस्तकांचा उल्लेख असून पश्चिम बंगाल शासनाच्या या मध्यवर्ती ग्रंथालयास खास उपक्रमाबद्दल दोन वेळा राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाल्याचे म्हटले आहे.

**मल्हन (२०१२)** यांनी इनफ्लिय्झीव फ्लॅनेट या खास विकसीत केलेल्या आणि दृष्टिदोष असलेले मुख्य वाचक असलेल्या डीजिटल ग्रंथालया बद्दल माहिती दिली आहे. प्रकाशकांबरोबर चर्चा करुन अनेक पुस्तकांचे ब्रेल तसेच डिजिटल रुपांतर करुन दृष्टिहिनांना वाचन साहित्य उपलब्ध करता येईल असे त्यांचे प्रतिपादन आहे.

**विज (२०१२)** यांनी . बद्दल माहिती दिली असून या द्वारे अंदाजे ५३०० इंग्रजी, १३० हिंदी आणि २०० तमिळ ग्रंथांच्या उपलब्धते बद्दल माहिती आहे.

## निष्कर्ष

विविध ग्रंथ व लेख यांचा अभ्यास केला असता असे आढळते की बहुतेक लेख किवा ग्रंथ हे तात्विक विवेचन करताना आढळतात. काही लेख हे दृष्टिहीनांकरिता उपयुक्त अशा माहिती तंत्रज्ञानातील उपकरणांची व त्याच्या वापराबाबत आढळतात. अभावानेच एखादा लेख ग्रंथालयीन सेवा-सुवीधा त्यांचा वापर आदीबाबत चर्चा करताना आढळतो.

# संदर्भ


Adetoro, Niran (2011) Availability and use of information materials by persons with visual impairment in Nigeria Information, Society and Justice, Volume 4 No. 2, ( December) 5-18p

, (2012) 1996-2012 पिल्लई, प्रिया आणि देशपांडे, नीला संपा. (२०१२) , . 84-89

, (2012) पिल्लई, प्रिया आणि देशपांडे, नीला संपा. (२०१२) , . 55-79

Bookshare.org. http://www.bookshare.org ( 02-07-2012)

Booth, P. DisinHe : Web content accessibility. // Ariadne. 21(1999). http://www.ariadne.ac.uk/issue21/disinhe/ ( 02-07-2012)

Borgman, C. L. From Gutenberg to the global information infrastructure : access to information in the networked world. Cambridge, Mass.; London : MIT Press, 2000.

8) BrailleNet. http://www.braillenet.org/ ( 02-07-2012 )

BrailleSurf 4. http://www.snv.jussieu.fr/inova/bs4/uk/ ( 02-07-2012 )

Brazier, H.; Jennings, S. FEATURE : accessible Web site design. // LTWorld. 1999. http://www.sbu.ac.uk/litc/lt/1999/news1330.html ( 02-07-2012 )

British Columbia Digital library's guides. http://bcdlib.tc.ca/guides.html ( 02-07-2012 )

Canadian National Institute for the Blind. http://www.cnib.ca/library/ ( 02-07-2012)

Chapman, A. In vision : the Internet as a resource for visually impaired people. // Ariadne. 24(2000). http://www.ariadne.ac.uk/issue24/in-vision/ ( 02-07-2012 )

Christensen, S. How we work to make the Web speak. // Computers in libraries. 21, 9(2001).http://www.infotoday.com/cilmag/oct01/christensen.htm ( 02-07-2012)

Craven, J. Understanding the searching process for visually impaired users of the Web. // Ariadne. 26(2001a). http://www.ariadne.ac.uk/issue26/craven/ ( 02-07-2012 )

Craven, J. The development of digital libraries for blind and visually impaired people. // Ariadne. 30(2001b). http://www.ariadne.ac.uk/issue30/ifla/ ( 02-07-2012)

, (2012) : ’ पिल्लई, प्रिया आणि देशपांडे, नीला संपा. (२०१२) , . 11-23

(2012) पिल्लई, प्रिया आणि देशपांडे, नीला संपा. (२०१२) , . 24-35

, (2012) पिल्लई, प्रिया आणि देशपांडे, नीला संपा. (२०१२) , . 90-91

पिल्लई, प्रिया आणि देशपांडे, नीला संपा. (२०१२) , . 109

(2012) पिल्लई, प्रिया आणि देशपांडे, नीला संपा. (२०१२) , . 1-3

, (2012) : पिल्लई, प्रिया आणि देशपांडे, नीला संपा. (२०१२) , . 36-47

, (2012) पिल्लई, प्रिया आणि देशपांडे, नीला संपा. (२०१२) , . 107-119

Wei, Zhang etc. (२०१०) Digital library development and services for visually impaired juveniles libraries for visually impared persoans in China www. 2012-08-08-zwei China (Accessed on 13,January 2013)

YURTAY, Nilüfer (2011) LIBRARY AUTOMATION DESIGN FOR VISUALLY IMPAIRED PEOPLE TOJET: The Turkish Online Journal of Educational Technology – (October), volume 10 Issue 4 p 255-260

# प्रकरण ३ - संशोधन पद्धती

**प्रस्तावना**

जिज्ञासा किंवा ज्ञान संपादन ही मानवाची एक मुलभूत प्रवृत्ती आहे. एखाद्या विषयासंबंधी किंवा घटनेसंबंधी अधिकाधिक ज्ञान मिळवणे व त्याची कारणमिमांसा करणे म्हणजे संशोधन होय. शब्दकोषात संशोधन याचा अर्थ शोध असा दिलेला आहे. सखोल चौकशीच्या सहायाने वस्तुस्थिती किंवा तथ्य शोधून काढण्याचा शास्त्रीय पद्धतशीर प्रयत्न म्हणजे संशोधन होय. कोणत्याही शास्त्राचा विकास हा संशोधन व तंत्र यामुळे घडून येतो. या तंत्रालाच शास्त्रीय पद्धत असे म्हणले जाते. सत्याचा शोध म्हणजे संशोधन होय. संशोधन म्हणजे ज्ञानाच्या शाखेत नवीन तथ्ये टाकणे किंवा जुने तथ्ये तपासणे.

शब्दकोषात संशोधन याचा अर्थ चौकशी अथवा शोध असाच दिलेला आहे. अभ्यासाचा किंवा काळजीपूर्वक तपासाचा अथवा सखोल चौकशीच्या सहाय्याने वस्तुस्थिती किवा तथ्य शोदून काढण्याच्या शास्रीय स्वरूपाचा पद्धतशीर प्रयत्न म्हणजे संशोधन होय. आजचे युग हे वैज्ञानिक युग म्हणून ओळखले जातो. आजच्या काळात प्रत्येक घटना शास्र द्वारा पारखण्याचा प्रयत्न होत आहे. शास्राचा विकास संशोधन आणि तंत्र यामुळे घडून येतो. या तंत्रालाच शास्रीय पद्धत असे म्हणतात. संशोधन आणि शास्र परस्परावलंबी आहेत. अनूभवाधिष्ठीत माहिती व तथ्ये संशोधनाद्वारे मिळवली जातात व समस्यांवर उपाय शोधले जातात.

**संशोधन म्हणजे काय ?**

सत्याचा शोद घेणे म्हणजे संशोधन होय एखादी गोष्ट पुन्हा शोधने म्हणजे संशोधन होय. Research यामध्ये Re म्हणजे पुन्हा पुन्हा आणि Search म्हणजे शोधणे असा संशोधनाचा अर्थ होतो.

संशोधन म्हणजे ज्ञानाच्या शाखेत नवीन तथ्ये किंवा जुनी तत्वे ततपासण्यासाठी काळजीपूर्वक पद्धतशीर व नेटाने केलेला अभ्यास होय.

जिज्ञासा किंवा ज्ञान संपादन ही मानवाजी एक मूलभूत प्रवृत्ती आहे. त्यासाठी तो आपल्या ज्ञानेंद्रियाचा उपयोग करी, असतो. "एकाद्या विषयासंबंधी किंवा घटनेसंबंधी अधिकाधिक ज्ञान मिळविणे त्यांची अधिकाधिक कारणमिमांसा करणे म्हणजे संशोदन होय".

संशोध नाची सुरवात प्रश्नात्मकतेमधून होते आणि अखेर ही निष्कर्षापर्यंत मानव आणि मानवासह सर्व स्थिर चलाचा शोध घेण्याच्या प्रयत्नातू अभिक्रिया पृष्ठ बनत जाते. संशोदन या संकप्लनेतून निर्माण झालेली शास्रे त्याच्यासाठी उपयोजिकेच्या पद्धती त्यांचे विविध प्रकार त्यांची साधन चिकित्सा या सर्व ज्ञान व्यवहारातून 'संशोधन विद्या' ही संकल्पना सिद्ध झालेली आहे .?

संशोधन हा शब्द संशोधन या दोन शब्दांनी मिळून बनलेला आहे 'स' चा अर्थ होतो संपूर्ण किंव समग्र आणि त्याचे शोधन म्हणजेच संपूर्ण म्हणून जे ज्ञात आहे. त्यामध्ये आणखी नवीन किंवा जे अद्यापही अज्ञान आहे ते शोधून काढण्यासाठीचे प्रयत्न संशोधनाचा अर्थ स्पष्ट करताना जिज्ञासेला प्राथमिकता द्यावी लागते. अधिक जाणण्याची प्रवृत्ती या प्रवृत्तीवरून जे जाणले गेले त्याच्या प्रमाणिकतेचा पडताळा अशुद्धाला शासन शुद्धाचे दर्शन घेणे ही अभिलाषा जेव्हा व्यक्तीला अस्वस्थ करते तेव्हा त्यातून अस्तित्वात येणारी कृती ही संशोधनाचे रूप प्राप्त करते.

जिज्ञासा किंवा ज्ञान संपादन करणे ही माववाचा एक मूलभूत प्रवृत्ती आहे. त्यासाठी तो आपल्या ज्ञान केंद्री याचा उपयोग करीत असतो. एखाद्या विषयासंबंधी किंवा घटनेसंबंधी अधिकाधिक ज्ञान मिळविणे आणि त्याचे अधिकाधिक कारणमिमांसा करणे म्हणजे संशोधन होय.  बूद्धीनिष्ठ आणि व्यवहारिक प्रश्नांची आणि समस्यांची शास्रीय पद्धतीद्वारे समाधानकारक उत्तरे शोधून काढण्याचा संशोधन हा एक पद्धतशीर प्रयत्न असतो.

सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि नैतिक स्वरूपाच्या घटना या सातत्याने घडत असतात. त्यात निश्चित असा कार्यकारण संबंध असतो. परंतू तो आपल्याला माहित

नसतो. त्यातील कार्य आणि कारणभाव यांच्यातील अन्योन्य संबंधाचे विश्लेषण करून त्याता शोध घेणे हा संशोधनाचा उद्देश आहे. आपल्या अनुभवाच्या कक्षेत येणा-या कोणत्याही घटनेसंबंधी असे का? हा प्रश्न आपल्या मनात येणे आणि त्यामुळे आपण अस्वस्थ होणे, हीच संशोधनाची पहिली पायरी आहे. या प्रश्नाचा सातत्याने पाठपूरावा करणे, त्या विषयासंबंधी संपूर्ण माहिती आणि आकडेवारीचे संपलन करणे, संकलित माहितीचे शास्रशुद्ध विश्लेषण करणे त्याची पद्धतशीर मांडणी करणे, निर्वचन करणे त्याची कारममीमांसा करणे आणि त्याचे उत्तर शोधने या सर्व प्रक्रियांचा शास्रीय, सामाजिक संशोधनात समावेश होतो. वर्तमान स्थितीत जाणीवपूर्वक केलेल्या प्रयत्नांना संशोदन असे म्हणतात. संशोधक हा सत्याचा असतो. अचुक उत्तर शोधने हा संशोधकांचा उद्देश असतो. नवीन ज्ञान संपादन केल्यामुळे त्याला समाधान मिळते. संशोधनामुळे समाजाच्या विकासाला मदत होते. संशोधक केवळ एक शैक्षणिक उपक्रम नसून नवीन काही तरी शोधून काढण्याचा तो एक संकल्प आहे. संशोदन हा एक प्रवाह आहे. कारण संशोधन कार्य हे कधीच संपत नसते. एखाद्या समस्येचे समाधानकारक उत्तर शोधण्यासाठी केलेल्या संशोधनातून अनेक दुस-या अनपेक्षित समस्या निर्माण होतात आणि त्यासाठी पुन्हा संशोधन करावे लागते. अशाप्रकारे संशोदन ही सतत नव्याचा, सत्याचा शोध घेण्याचा एक व्यवस्थित व संघटीत प्रयत्न आहे.

**संशोधनाच्या व्याख्या**

१) चार्ल्स बुशा आणि स्टिफन हार्टर यांना त्यांच्या रिसर्च मेथडस् इन लायप्ररियनशिप या

पुस्तकात संशोधन म्हणजे ज्ञानप्राप्तीसाठी घेतलेला शोध अशी व्याख्या केली आहे.

२) जे. डब्लू बेस्ट यांच्या मते संशोधन ही एक प्रक्रिया असून त्या द्वारे शोध घेतला जातो.

३) वेबस्टर शब्दकोषानुसार संशोधन म्हणजे तथ्ये व तत्व शोधण्याकरिता करण्यात येणारी चिकित्सा होय.

**वर्णनात्मक संशोधन पद्धती**

सर्वेक्षण किंवा वर्णनात्मक पद्धती वर्तमान कळशी संबंधित असून अभ्यास विषयाचा विविध क्षेत्रातील वर्तमान स्थिती निशित करणे हा याचा मुख्य उद्देश आहे. या पद्धतीमध्ये वर्तमानाचा शोध घेतला जाऊ शकतो. ही संशोधनपद्धती वेगवेगळ्या नावानी प्रचलित आहे. तिला आदर्श मूळ सर्वेक्षण पद्धती अथवा वर्णनात्मक पद्धती असेही म्हणतात. या पद्धतीमध्ये संशोधक सध्यस्थितीचे स्पष्ट वर्णन करू शकतो. माहिती संकलनातून अनुमान काढण्याची प्रवृत्ती या पद्धतीत दिसते. या पद्धतीत माहिती संकलित करणे, माहितीचे मापन करणे, वर्गीकरण करणे मुल्यांकन करणे, स्पष्टीकरण करणे, तुलना करणे, सार्थकता दर्शवणे ई. चा समावेश होतो. विशिष्ठ संस्था, व्यक्ती समूह यांच्या स्थितीच्या वैशिष्ट्याचे यथातथ्य वर्णन करणे हा वर्णनात्मक पद्धतीचा हेतू असतो.

वर्णनात्मक संशोधन पद्धतीत कोणत्याहीघटनेचा किंवा सामाजिक संस्थेच्या एखाद्याउपक्रमाच्या सध्यस्थितीचा सर्वंकष अभ्यास करून प्रगीतीचा आढावा घेण्यात येतो व विश्लेणात्मक वर्णन करण्यात येते. सामाजीकशास्त्रात याचा मोठ्या प्रमाणात वापर करण्यात येतो.

वर्णनात्मक संशोधन पद्धतीत तथ्य संकलनासाठी अनेक तंत्रांचा वापर केला जातो. वस्तुनीष्ट तथ्य संकलनकरण्या करिता वर्णनात्मक पद्धतीत मुलाखत, प्रश्नावली, निरीक्षणे, ई चा वापर केला जातो. प्रश्नावली हे एक महत्वाचे साधन आहे. संशोधकाने प्रश्नावलीचा वापर माहिती संकलनासाठी केला आहे.

महाराष्ट्रातील ब्रेल लायब्ररीच्या तौलानिक अभ्यास करताना अथवा **वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा** वापर केलेला आहे. अभ्यासविषयाचा वर्तमानकाळाशी अधिक संबंध आहे. वर्णनात्मक संशोधनात सद्य:स्थिती काय आहे याचे वर्णन व अर्थविवेचन केले जाते. कोणती स्थिती qकवा संबंध अस्तित्वात आहेत, कोणती मते आहेत, कोणत्या प्रक्रिया चालू आहेत. कोणते परिणाम दिसून येतात, कोणत्या प्रवृत्ती दिसून येतात या बाबींशी अभ्यास विषयाचा घनिष्ट संबंध आहे. या संशोधनाचा मूलतः

वर्तमान  काळाशी संबंध आहे. तथापी भूतकाळात घडलेल्या व परिणामांचा सुद्धा यामध्ये बëयाच वेळा विचार केला जातो. कारण त्यांचा सद्यस्थितीशी संबंध असतो.

वर्णनात्मक संशोधनाच्या आधारे पुढील तीन प्रश्नांची उत्तरे शोधावी लागतात.

अ) संबंधित ग्रंथालयीन समस्येबाबात आजची परिस्थिती काय आहे?

ब) यामध्ये निश्चितपणे कोणत्या अडचणी वा त्रुटी आहेत.

क) मिळालेल्या  माहितीच्या आधारे, विविध तज्ज्ञांची  मते घेऊन  व स्वत:चे  ज्ञान व अनुभव विचारात घेऊन या समस्येवर कोणता उपाय आहे याचा शोध घ्यायचा आहे.

वरील सर्व प्रश्नांची वैज्ञानिक पद्धतीने माहिती मिळवण्याचा प्रयत्न करणे गरजेचे आहे. वर्णनात्मक  पद्धती वापरुन संशोधकाने प्रश्नावलीच्या माध्यमातून  महाराष्ट्रातील ब्रेल ग्रंथालयांबद्दल माहिती घेण्याचा प्रयत्न केला.

**प्रश्नावली पद्धती**

संधोधन  कार्यात  तथ्य संकलनाच्या  अनेक  पद्धतीचा उपयोग  करण्यात येतो. त्यापैकी प्रश्नावली ही पद्धती अतिशय सोपी व फायदेशीर आहे. प्रश्नावली हे तथ्य संकलनाचे एक तंत्र आहे.  प्रश्नावली ही नावाप्रमाणेच प्रश्नांची एक पूर्व नियोजित क्रमाने मांडण्यात आलेली यादी असते. ही सामान्यतः उत्तरदात्यांना पोष्टाने पाठविली जाते qकवा काही परिस्थितीत व्यक्तीशः दिली जाते.

ब्रेल  ग्रंथालयाचा  तौलानिक  अभ्यास करतानाही संशोधनाचे  एक महत्वाचे  साधन आहे  म्हणून प्रश्नावली पद्धतीचा उपयोग केलेला आहे. प्रश्नावली तंत्राचे दोन प्रकारातील तथ्य संकलनासाठी वापरले गेले

**संरचित प्रश्नावली**

यात पूर्व  निर्धारीत, सुस्पष्ट  व निश्चित आहे.  यातील प्रश्नांची उत्तरे बंदिस्त व मुक्त दोन्ही स्वरुपाची असतात

**असंरचित प्रश्नावली**

हे तंत्र वरील संशोधनास फारसे उपयुक्त व सोईचे नव्हते म्हणून वापरलेले नाही

प्रश्नावलीतील प्रश्नांचे प्रकार खालील प्रमाणे आहेत.

१) परिचय माहिती संबंधीचे प्रकार

२) उत्तरदात्याच्या ग्रंथालयीन पाश्र्वभूमी संबंधीचे प्रश्न

उत्तरदाता ज्या ग्रंथालयीन संस्थेत कार्यरत आहे. त्या ग्रंथालयासंबंधीची संपूर्ण माहिती यात अंतर्भूत असते.

संशोधकाने संचरीत प्रश्नावालीचा वापर केला व माहिती संकलित केली.

# प्रकरण ४ - ब्रेल ग्रंथालये

## ब्रेल लिपीचा इतिहास

आता प्रचलित असलेली ‘ब्रेल लिपी निर्माण कशी झाली ? ‘लुई ब्रेल पूर्वी कोणी अंध व्यक्तींना शिक्षित करावं असा विचार केला नव्हता की काय ? असे अनेक प्रश्न मनात येणारच. याकरता अंधांची सामाजिक स्थिती ब्रेलपूर्व काळात कशी होती हे जाणून घेणं महत्वाचं आहे. अनेक वर्षांपूर्वी अंध व्यक्ती ही सामान्य लोकांपेक्षा खूप खालच्या दर्जाची मानली जायची, इतकंच नव्हे तर इतर कोणत्याही मानसिक वा शारिरीक व्याधीग्रस्त व्यक्तींपेक्षाही अंध व्यक्तीच स्थान कमी दर्जाचं अन् तुच्छ होतं. भीक मागणे हे अंध व्यक्तीचं अर्थार्जनाचं मूळ साधन होतं. कधी-कधी त्यांना नाटकात रंगमंचावर सोडून दिलं जायचं अन् अडखळणाऱ्या जीवांकडे पाहून लोक आपलं मनोरंजन करुन घेत असत. यांचं स्थान एखाद्या विदूषकाचं असायचं. त्यांना अस्पृश्य अन् पापी मानलं जायचं. अत्यंत क्रूरपणे वागवलं जायचं. यांची रहायची जागा होती धान्याच्या कोठारात अन् वेळप्रसंगी त्यांना होडीत बसवून त्यांची नाव प्रवाहात वा नदीत चक्क लोटून दिली जायची. विश्वभर अंध व्यक्तींना पाप समजलं जायचं. त्यांना जगण्याचा अधिकार पूर्णपणे नाकारला जायचा. अंध मूर्ख अन् मतिमंद असतात असाही समज होता. अंधांच जीवन परावलंबी होतं अन् समाजाच्या सहानुभूतीवर त्यांना पूर्णपणे अवलंबून रहावं लागायचं. वाळवंटातलं मृगजळ असावं तसा कधीतरी सहृदयतेने अंध शिक्षणाकडे पहायचा भावनिक ओलावा काही मंडळींनी दाखवलाही. दोरीवरच्या गाठींच्या माध्यमातून अंध व्यक्तींना अक्षरं शिकवायचा प्रयत्न झालेला होता. कोणी उठावाची अक्षरं काढली तर कोणी लाकडात अक्षरं कोरली. कोणाचं माध्यम मेण होतं व भूमितीतील आकृत्या कोरुन अंध व्यक्तींना शिक्षण देण्याचा प्रयासही झाला होता, पण हे प्रयास अन् प्रयत्न अत्यंत अपूरे होते.

अशा सामाजिक पाश्र्वभूमीचा विचार करता लुई ब्रेलनं ब्रेल लिपीचा शोध कसा लावला हे जाणून घेतलं तर आपण आश्चर्यचकित झाल्याशिवाय राहणार नाही. लुईच्या आयुष्यात

अॅबे जॅक्क्स् पॉली (’ ) नावाचे एक धर्मगुरु आले. लुईची अन् त्यांची दोस्ती झाली. निसर्गातल्या विविध घटना अॅबे पॉलींनी लुईच्या जीवनात वर्णनातून सजीव केल्या. कूपव्हरे ()या लुईच्या जन्मगावी लुईनं शालेय शिक्षण घेतलं. वर्गात सर्वात वरचा क्रमांक लुईचा असायचा. त्यानं आपलं अंधत्व कबूल केलं अन् त्याच्यावर मात करायचा त्याने चंग बांधला. लुईच्या वडिलांना बाकावर मूळाक्षरांच्या आकाराचे खिळे ठोकले आणि स्पर्शानं लुई स्वत:च भाषा शिकायला लागला.




**लुई ब्रेल**

लुईच्या ज्ञानलालसेला आता मर्यादा आल्या. अंधांना विशेष शिक्षण देणाऱ्या शाळेचा शोध घेणं लुईच्या उत्साही शिक्षकाला गरजेचं वाटू लागलं. ’ आणि ’ यांनी या गावच्या जमीनदाराची भेट घेतली अन् लुई यांनी स्थापलेल्या ६८, या शाळेत दाखल झाला. आश्चर्याची गोष्ट म्हणजे या शाळेत यांनी अंधांसाठी छापलेली पुस्तकं उपलब्ध होती. अतिशय जाड कागदावर उठावाची अक्षरं छापलेली होती अन् स्पर्शज्ञानानं अंध मंडळी ही

पुस्तकं वाचू शकायची. अगदी मर्यादित प्रमाणातच ही पुस्तकं उपलब्ध होती अन् ती तयार करण्याची प्रक्रिया अत्यंत खर्चिक अन् महागडी होती.

यांनी तयार केलेल्या पुस्तकात अक्षरांचा आकार फार मोठा असायचा, फारच कमी मजकूर एका पानात बसू शकायचा, पुस्तकं फार मोठी व्हायची, खर्चही खूप लागायचा. एखाद्या पुस्तकाला वीस विभाग असायचे अन् प्रत्येक विभागाचं वजन नऊ किलो सुद्धा असायचे !!! याच काळात नशीबानं . म्हणून एक शिक्षक लुई ब्रेल च्या आयुष्यात आले अन् लुईला प्रथमच कळलं की जीवन सुंदर आहे, जगण्यासारखं या जीवनात खूप काही आहे.

१७८५ च्या सुमारास राजा लुई अठरावा याच्या सैन्यातला कॅप्टन चार्लस्ट बार्बिअर ( ) हा यांच्याकडे एक अत्यंत आकर्षक योजना घेऊन आला. त्याने लिखाणाचा एक नवा प्रकार शोधला होता. ज्यात केवळ टिंबं अन् डॅशेस् होते. ह्या लिखाणाचा वापर रात्रीच्या वेळी सैनिकांना गुप्त संदेश पाठविण्यासाठी तो करत असे. अंधार कितीही असला तरी ही रात्रीची लिपी सैनिकांना वाचता यायची. यांची पुस्तकं बार्बिअरने पाहिली होती अन् विद्यार्थ्यांच्या वाचनाची गती अत्यंत संथ होती हे ही जाणलं होतं.



च्या मनात एक सुंदर कल्पना आली. त्याच्या रात्रीच्या लिपीतं थोडा बदल आणला तर अंध व्यक्ती ही लिपी लिहू-वाचू शकतील अशी आशा त्याच्या मनात निर्माण झाली. ह्या लिपीला म्हणायचे कारण प्रत्येक अक्षराच्या माध्यमातून स्पेqलग निर्माण करण्याऐवजी वेगवेगळे उच्चारच टिंब अन् डॅशेस्च्या वेगवेगळ्या समूहाने कळत. बार्बिअरने अंधांच्या पेनाचाही शोध लावला ज्याला इंग्रजीत म्हणतात. आता अंध व्यक्तींना चक्क लिहिताही येऊ लागलं.

लुईच्या कुशाग्र बुद्धीला आता आव्हान होतं. बार्बिअरने निर्माण केलेल्या लिपीमध्ये खूप अडचणी होत्या. शब्द हा केवळ उच्चारांचा समूह होता. स्वल्पविराम, पूर्ण विराम अथवा कुठलीही व्याकरणातील चिन्हे येथे वापरता येत नव्हती. फ्रान्समध्ये उच्चाराची विशिष्ठ पद्धती आहे, तिच्या वापरावरही बार्बिअर लिपीमुळे मर्यादाच येत होत्या. लुईला आकडे लिहिणे, गणितं करणे व संगीतातल्या नोटस् लिहिणे शक्यच नव्हते. एकाच शब्दासाठी अगणित टिंबांचा वापर होता ! बोटांच्या स्पर्शक्षेत्रात ही मोठ्ठी लिपी बसतच नव्हती.

ब्रेल लिपीच्या शोधाचं संपूर्ण श्रेय लुईला देता येणार नाही, पण आधुनिक युगातील अंध व्यक्ती जी लिपी वापरत आहेत त्या लिपीचा सुबकपणा अन् व्यवहार्यता यासाठी लुई ब्रेललाच आपल्याला श्रेय द्याव लागेल. त्याने आत्ताची प्रचलित सहा टिंबांची ब्रेल लिपी तयार केली. बोटांच्या स्पर्शाच्या दुनियेत मावेल एवढाच अक्षरांचा आवाका त्याने ठेवला. अत्यंत चपखल अन् अचूक अशी टिंब रचना हे लुई ब्रेलचं श्रेय आहे. केवळ उच्चारांवर अवलंबून नाही तर प्रत्यक्ष स्पर्शज्ञानावर अवलंबून असणारी एक परिपूर्ण लिपी ज्यात डोळ्यांसारखी वाचन-लेखन व्यवस्था होती. व्याकरणातील डोळसांचे नियम वापरता येत होते, गणिताचं प्राथमिक शिक्षण, संगीतातल्या नोटेशन्स् व शॉर्टहॅन्डही घेता येत होतं - ही लिपी निर्माण केली लुईनच !


कॅप्टन बार्बिअर यांना नजर होती तर लुईला स्पर्शाची जादू कळणारी बोटं होती. दोन्हीचा संगम होऊन निर्माण झाली आजची ब्रेल लिपी जिनं ज्ञानाचं भांडार अंध व्यक्तींसाठी खुलं केलं.

भारती ब्रेल: १९४९ पर्यंत भारतात  च्या मदतीने सर्व प्रादेशिक भाषात ब्रेलचा वापर सुरु झाला. भारतात १०० च्या वर भाषा आता ब्रेलमध्ये लिहिता येतात. १९५१ मध्ये ब्रेल लिपीला विश्वालिपी म्हणून मान्यता मिळाली अन १९५२ मध्ये भारती ब्रेल चा प्रत्यक्ष वापर भारतात सुरु झाला.

**ब्रेल ग्रंथ मोठी जागा व्याप्त करतात**



**ब्रेल लिपिमधील चार्ट** .





**ब्रेल ग्रंथ असा दिसतो**

ब्रेल लिपी विश्व लिपी ही उच्चारावर आधारित आहे. म्हणूनच ती विश्व लिपी झाली आहे. ही लिपी सहा टिंबाची असून टिंब क्रमांक बदलला की  अक्षर बदलते. या टिंबाच्या विविध जुळणी मधून संपूर्ण ब्रेल लिपी तयार झाली आहे.

‘प्रिंट डिस्‌ॲबिलिटी अथवा लिपी वाचनातील अडचणी केवळ दृष्टिदोष असणाèया व्यक्तींनाच येतात. म्हणूनच त्यांच्यासाठी पुस्तकं वेगळ्या लिपीत छापावी लागतात. इतर अंपगत्वामध्ये लिपीचा प्रश्न उद्भवत नाही. अंध व्यक्तींसाठी खालील प्रकारची पुस्तकं आवश्यक असतातः

१) ब्रेल लिपीतील पुस्तके

२) इंग्रजी पूर्ण स्पेलिंग असणारी ब्रेलमधील पुस्तके

३) इंग्रजी संक्षिप्त लिपीत असणारी पुस्तके

४) मोठ्या प्रिंटमधील पुस्तके

५)        ध्वनिफिती

६)        ए पुस्तके

७)        डेझी पुस्तके व डेझी रीडर

८)        ग्रंथालय

**ब्रेल वाचक ग्रंथ वाचताना**



दृष्टिदोषाचे अनेक प्रकार असल्यामुळे दृष्टिदोष असणाèया व्यक्तीच्या वैयक्तिक गरजेनुसार ही पुस्तके उपलब्ध व्हावी लागतात.

१) अंध व दृष्टिबाधित व्यक्तींना लायब्ररीची सेवा उपलब्ध आहे का?

२) ती कोणकोणत्या घटकराज्यात उपलब्ध आहे ?


## भारतातील ब्रेल लायब्रीची स्थिती


'इन्क्लुझिव्ह लायब्ररीज् - इनिशिएटिव्हज् इन इंडिया या लेखात सौ. प्रिया पिल्ले व डॉ. एन्. जे. देशपांडे म्हणतात आपण उपलब्ध पुस्तकांचा आढावा घेतल्यास केवळ ५% पुस्तकच आपल्याला अंध व्यक्तींना वाचता येतील अशा स्वरुपात आहेत असे आढळते. भारतात सार्वजनिक ग्रंथालय सर्वसामान्य वाचकांनाच अनेकदा आवश्यक ते वाचनसाहित्य उपलब्ध करुन देण्यात असमर्थ आहेत. आपण जर जायब्ररीतील भौतिक वातावरणाचा विचार केला तर आपल्याला असे आढळून येईल की अनेक वाचकांना पुस्तकांचा उपयोग करता येईल अशी व्यवस्थाच ग्रंथालयांमध्ये नाही. प्रशिक्षित कर्मचारी वर्गाचा अभाव, आवश्यक व योग्य त्या साधनांची कमतरता इत्यादी अनेक अडचणींना तोंड देता देता वाचनप्रेमी व्यक्तीचा उत्साहही खच्ची पडतो. ग्रंथालय वास्तविक पाहता ज्ञानाच्या भांडाराचे स्रोत असतात. ग्रंथालयाची गरज जितकी डोळसांना असते तितकीच qकबहुना अधिक गरज ब्रेल साहित्य वाचकांनाही असेलच. पुस्तकांची गरज करमणूकीसाठी, शैक्षणिक, करियर, आयुष्यातला फावला वेळ घालवणे इ. अनेक कारणांसाठी असते.

दृष्टिदोष असणाèया विद्यार्थ्यांना ग्रंथालय सेवा शैक्षणिक व सार्वजनिक क्षेत्रात फारच कमी प्रमाणत दिली जाते. सार्वजनिक ग्रंथालयांची अशी समजूत आहे की विशेष गरजा असणाèया व ब्रेल लिपीत पुस्तके हवी असतील तर त्यांच्या गरजा नॅशनल इन्स्टिटयूट फॉर व्हिज्युअली हॅन्डीकॅप (एन्. आय. व्ही. एच.) व इतर सेवाभावी, खाजगी संस्थांनी () पूर्ण कराव्यात. वाचन हा व्यक्तीचा हक्क आहे व दृष्टिबाधित व दृष्टिहिनांनाही वाचनाची भूक असते याची जाण व जागृती व विशेष ग्रंथालये म्हणून मान्यता अजून तरी आपल्या वाचनालयांमध्ये आढळून येत नाही. ब्रेल ग्रंथालयांनी सरकारी अनुदान अजूनही मिळत नाही, त्यामुळे त्यांना आवश्यक अशा विशेष सुविधा आढळून येत नाहीत. अपंगांबद्दलची धोरणंच अजून निश्चित नाहीत. (सोबत या बाबतचा अहवाल देत आहे) या दोन अनुभवी ग्रंथपालांनी लिहिलेल्या लेखात एक अत्यंत महत्त्वाचं वाक्य आहे - ' ' हे वाक्य फार बोलकं व वास्तव परिस्थितीचं चित्रण करणारं आहे.





नॅशनल इन्स्टिटयूट फॉर व्हिज्युअली हॅन्डीकॅप (एन्. आय. व्ही. एच.) ची वेब साईट








राष्ट्रीय ब्रेल ग्रंथालय व बोलक्या पुस्तकांचे ग्रंथालय



सरकारी अनुदान नसल्यामुळे काही संस्था ब्रेल पुस्तकांसाठी स्वत: खटपट करुन निधी उभा करतात. अन्यथा अंध व अंशत: अंध ( ) व्यक्तींना समाजाच्या दयेवर व दानावर अवलंबून राहावं लागतं. वास्तविक पाहता वाचनसाहित्य मिळणं हा नागरिकांचा मुलभूत हक्क आहे ना ? या हक्काची पूर्ण गळचेपी झालेली आपल्या देशात आढळून येते.




इंग्लडमधील (रॉयल इन्स्टिटयूट ऑफ ब्लाइंड पीपल) या १८६८ साली स्थापित झालेल्या संस्थेच्या अनुसार दृष्टिदोष असणाèया व्यक्तींना शैक्षणिक, सामाजिक जीवनात, कार्यालयात, सांस्कृतिक जीवनात सर्वसामान्यांबरोबरच जगावं लागत. अस असताना सर्वसामान्य डोळस व्यक्तीप्रमाणेच दृष्टिबाधित व्यक्तीनाही वाचनसाहित्य उपलब्ध व्हावं हा वास्तविक पाहता सामाजिक न्यायच आहे. हे वाचनसाहित्य त्यांना मिळावं तद्वतच त्याची qकमतही त्यांना परवडेल अशीच असावी. भारतामध्ये अंध, अंशत: अंध, दृष्टिबाधित यांना सार्वजनिक ग्रंथालय व शैक्षणिक ग्रंथालयांच्या माध्यमातून वाचन साहित्य दिल जात नाही ही गोष्ट योग्य नव्हे. व्यावसायिक ग्रंथालय असो वा ऐच्छिक काम करणाèया संस्था असोत, अंध व्यक्तींना वाचन साहित्य उपलब्ध करुन देणं ही त्यांची नैतिक जबाबदारीच आहे.




परदेश्यात अंध व्यक्तींकरिता उपलब्ध ग्रंथालये



## दृष्टिबाधितासाठी समावेशक ग्रंथालये कशी निर्माण करता येतील ?

समावेशक ग्रंथालयात समाजातील सर्व व्यक्तींचा समावेश असतो. सर्व कार्यक्रम व सेवा सर्वांना खुल्या दिलानं वापरु दिल्या जातात. भौतिक व दृष्टिकोनात्मक अडथळे दूर करुन ग्रंथालयाच्या सुविधा वापरु इच्छिणाèया सर्वांना त्या दिल्या जातात. भारतात अस्तित्वात असणारी सर्व ग्रंथालय सर्वसमावेशक ग्रंथालयात परिवर्तित होऊ शकतात. यासाठी वरिष्ठ अधिकारी यांची थोडीशी मदत आवश्यक आहे. समावेशेशक ग्रंथालये म्हणजे खालील सुविधा मिळणे:

१)ग्रंथालयाचे आवार दृष्टिबाधितांना वापरता येईल असे असणे.

२)ग्रंथालयीन सेवा व कार्यक्रम

३)ग्रंथालयाचे स्त्रोत असे असावेत की सुविधा सर्वांना उपलब्ध होतील.

## ग्रंथालय सेवे अंतर्गत कार्यक्रम


दृष्टिबाधित वा अंध व्यक्तींसाठी असणारी ग्रंथालये अंध व्यक्तींना सुविधा देण्यासाठी सुसज्ज असाव्यात. या ग्रंथालयांना खालील स्त्रोतांची गरज असते - छापील, ऑडिओ व डिजिटल स्वरुपात हे स्त्रोत उपलब्ध असायला हवेत. अंध व्यक्तींना वापरता येतील व व्यावसायिक तत्वावर चालवता येईल अशी व्यवस्था असणे गरजेचे आहे. ग्रंथालयांनी जे कार्यक्रम व योजना राबविण्याचा विचार केलेला आहे त्याबद्दल अंध व्यक्तींनाही माहिती दिली गेली पाहिजे. या सूचना ब्रेलमध्ये अंध व्यक्तींना वाचता येतील याचीही व्यवस्था करण्याची गरज आहे. असिस्टिव्ह टेक्नॉलॉजीचा वापर कशा पद्धतीने करावा याबद्दल अंध व्यक्तींना वेळोवेळी प्रशिक्षण दिले गेले पाहिजे.

दृष्टिदोष असणाèया व्यक्ती सर्वसामान्य व्यक्तीप्रमाणे ग्रंथालयास वरचेवर जाऊ शकणार नाही व हे लक्षात घेऊन पोस्टाद्वारे पुस्तक सेवा, वाचनासाठी अधिक कालावधी देणे, नवीन छापलेल्या पुस्तकांची माहिती पुरविणे वगैरे गोष्टींबाबत सर्व अंध वाचकांना वेळोवेळी

